ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ३६

अश्विनी मांडके–कवीश्वर
(१९७९–१९८५)

दि. ५ सप्टेंबर २०२१

मी आत्ता ज्या उद्योगसमूहामध्ये काम करते तिथे अनेक वेगवेगळे मोठ्या स्तरावरचे प्रकल्प करायला मिळाले. सिव्हिल इंजिनीअरिंग आणि अशा प्रकारच्या प्रकल्पांवर काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण तर खूपच नगण्य होते हे अनेकदा जाणवायचे. सुरुवातीच्या काळात अनेक प्रकल्पांच्या जागेवर स्त्रियांसाठी स्वच्छतागृह सुद्धा उपलब्ध नसायची. ग्राहकांच्या अधिकारी वर्गाला एखाद्या स्त्री अधिकाऱ्या बरोबर काम करण्याची फारशी सवय नव्हती. त्यांच्या मानसिकतेवरती पण मला काम करावं लागलं होतं. संपूर्ण टीममध्ये एकही स्त्री कर्मचारी अथवा अधिकारी नसताना, बरोबरीच्या पातळीवर चर्चा करणं, सहकारी पुरुष कर्मचाऱ्यांना सूचना देणं, त्यांच्याकडून कामं करवून घेणं, एक अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळणं या तशा अवघड गोष्टी होत्या. आणि यासाठी स्वतः आत्मविश्वासाने समोर उभं राहणं, स्वत:वर काम करणं हे मला आधी करावं लागलं. काही वेळेस पुरुषी अहंकाराला सामोरं जावं लागलं आणि काही वेळेस चुकीच्या मार्गाच्या वागणुकीलाही सामोरं जावं लागलं, पण तुम्ही तुमच्या कामाशी एकनिष्ठ आणि प्रामाणिक असाल तर पुढे जाण्यापासून तुम्हाला कोणीही रोखू शकत नाही या एका सिद्धांतावर ठाम राहिले.

## शिक्षकांच्या हृद्य आठवणी



बालशिक्षण ते प्रबोधिनी

माझं चौथीपर्यंतचं शिक्षण बालशिक्षण मंदिर या शाळेत झालं. माझ्या वडीलांच्या सांगण्यावरून मी प्रबोधिनीची परीक्षा दिली. त्यावेळेस तेवढी समज नसूनही या शाळेत नेतृत्वगुण विकसित होतात म्हणून या शाळेत जायचं असं त्यांनी सांगितलेलं नक्की आठवतं. आणि त्यानंतर प्रबोधिनीपणाची सुरुवात झाली.

सुप्रियाताईंच्या बाबतीतली एक खूप हृद्य आठवण आज माझ्याकडे जपून ठेवलेली आहे. शाळेत येऊन जेमतेम महिनाही झालेला नव्हता. शाळेत कुठलातरी कार्यक्रम झाला होता. तो झाल्यावर बाबा मला घ्यायला यायचं विसरले होते. आणि मला सुप्रियाताईंनी घरी सोडलं होतं. घरच्यांसाठी शाळेत येऊन अजून चार दिवस झाले नाहीत आणि शिक्षिका घरी सोडायला येतात ही गोष्ट खूप वेगळी होती.



आणखी एक अशीच आठवणारी गोष्ट म्हणजे आम्हाला इतिहास आणि मराठी शिकवायला सुहासिनीताई होत्या, त्यांनी माझ्या निबंधाला १० पैकी १५ मार्क दिले होते. आणि त्यांनी वर्गात त्याचा आवर्जून उल्लेख केला होता. इतक्या छोट्या-छोट्या गोष्टीने समरस करून घेतलं जायचं. असं प्रोत्साहन मिळत जायचं.



आ. गुरुजन रामभाऊ डिंबळे आणि अशोकराव निरफराके यांच्या बरोबर

दुसरी आठवणारी गोष्ट म्हणजे उपासना आणि त्याआधीचं मौन. 'चिदानंद रूपः शिवोऽहम शिवोऽहम' असं म्हणताना खूप छान वाटायचं. माझ्या एका प्रकल्पाच्या निमित्ताने मी अद्वैत वेदान्त या सिद्धांताचा थोडासा अभ्यास केला तेव्हा मनोमन हे जाणवले की हा किती शाश्वत मंत्र आहे. आणि मग लक्षात आलं की काहीही कळत नसताना या सगळ्याचे संस्कार आपल्या मनावर प्रबोधिनीने आधीच केलेले आहेत.

सरस्वती पूजनाच्या दिवशी आम्ही दिवसभर मौनाभ्यास करायचो. नंतर सहामाही परीक्षा सुरू व्हायची. अजूनही मला दरवर्षी सरस्वती पूजनाच्या दिवशी मौनाभ्यासाची आठवण येते. दिवस सुरू होण्याच्या आधीची प्रार्थना, गीता-गीताई, श्रीसूक्त याचं पठण व्हायचं. वेगवेगळी शिबिरं व्हायची, त्यात आपल्या बरोबरच्या मुलींना घेऊन उत्तम पण स्वावलंबी असं नियोजन करायला लागायचं. वारी, अभंग, गणेशोत्सव ही मजा विसरणे शक्यच नाही.

**दर रविवारी लताताईंच्या घरी आमची बैठक असायची. मी शाळा संपल्यावरही अनेक काळ त्या बैठकांना जात होते. तिथे वेगवेगळ्या सामाजिक विषयांवर चर्चा व्हायच्या. त्या चर्चांमध्ये आम्ही आमच्या परीने मतं मांडायचो. लताताई आमच्या विचार प्रक्रियेला छानसं वळण द्यायच्या. त्या जे बोलायच्या ते खूप श्रवणीय वाटायचं, आणि खूप शिकायला मिळायचं. आम्ही ८वीत असताना आप्पा गेले. तो दिवस सगळ्यांसाठी फारच दुःखद होता. आम्हाला त्यांचा सहवास कमी वेळ लाभला. अगदी व्हरांड्यातून चालताना सुद्धा ते समोरच्या प्रत्येक विद्यार्थ्याशी प्रेमाने बोलायचे. आपलंसं करायचे. ते गेले तेव्हा आपल्याच घरचं कोणीतरी गेलं आहे असं आम्हा सगळ्यांना वाटत होतं. त्यांच्याकडे कसलाच बडेजाव नव्हता. अहंकार नव्हता. अगदी साधी रहाणी होती.**



प्रबोधिनीमधल्या वर्गमैत्रिणी

**वेगळ्या अभ्यासक्रमाची निवड**

११वी – १२वी विज्ञान शाखा निवडून मी PCMB असे चारही विषय घेतले होते. १२वीच्या परीक्षेनंतर पुण्यातील सीओईपीमध्ये सिव्हिल इंजिनीअरिंग आणि बाहेरगावी वैद्यकीय शाखेमध्ये प्रवेश मिळत होता. तेव्हा मी पुण्यातून पदवी घेण्याचा निर्णय घेतला. कुठेतरी मनात या शाखेचे शिक्षण घेऊन समाज कार्यासाठी आपण उपयोगी पडू असे वाटत होते. पुढे जाऊन आपला हा निर्णय बरोबर आहे हे जाणवले आणि अधिकच हे शिक्षण आवडायला लागलं होतं. सिव्हिल इंजिनीअरिंगमध्ये पाणी पुरवठा, सिंचन, इमारतींचे बांधकाम, वाहतूक हे सगळे विषय आवडत गेले आणि नंतर व्यापक काम करण्याची संधी मिळत गेली.



**प्रबोधिनी ते सीओईपी**

आमच्या वेळेला इंजिनीअरिंगसाठी आणि त्यात सुद्धा सिव्हिल इंजिनीअरिंगसाठी खूप कमी मुली प्रवेश घेत असत. एकूण १२० जणांच्या बॅचमध्ये आम्ही फक्त दहा मुली होतो. त्यामुळे इतर सर्व ब्रांचेस मधल्या मुलींशी सुद्धा खूप घट्ट मैत्री झाली. सीओईपीच्या काही ठळक आठवणी म्हणल्या तर तेव्हा सीओईपी मुलींच्या वसतिगृहात प्रत्येक वर्षीच्या मुलींकरता फक्त चार जागा होत्या. आमच्या एका मैत्रिणीच्या नेतृत्वाखाली मुलींनी निवेदने, मोर्चे आणि बैठका घेऊन शेवटी एकूण ६० जणींची सोय असलेला भाग मुलींचे वसतिगृह म्हणून मान्य करून घेतला होता.

सीओईपी आणि बोट क्लब याचं एक अतूट नातं आहे. दरवर्षीचे अनेक बोटींच्या विविध रचना आणि नयनरम्य प्रात्यक्षिके हा एक देखणा सोहळा असायचा. मी पहिल्या वर्षात शिकत असताना रिगाटाचे हिरक महोत्सवी वर्ष होते. आम्ही सगळ्यांनी त्यात उत्साहाने भाग घेऊन अतिशय अप्रतिम प्रात्यक्षिके सादर केली होती.



**सीओईपी मधल्या दहा जणी**

क्षेत्र भेटी, रात्रभर जागून केलेली सबमिशन्स, स्टडी लिवज्, शेवटच्या वर्षी अतिशय गतीने केलेली 'रनवेची दुरुस्ती' हा प्रकल्प या सगळ्या न विसरता येणाऱ्या आठवणी आहेत. कॉलेज मधून बाहेर पडल्यावर मात्र सिव्हिल इंजिनीअरिंगची पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांनी काय करायचं असा मोठा प्रश्न होता. तेव्हा आत्ता सारखे जागतिकीकरण झालेलं नव्हतं आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये झीरो बजेट लागू केलेलं असल्यामुळे पुरेशा संधी मिळत नव्हत्या. सुरुवातीचे वर्ष दीड वर्षं मी एका बांधकाम व्यवसाय असणाऱ्या कंपनीमध्ये काम करत होते. त्या नंतर मी किर्लोस्कर कन्सल्टंट या कंपनीमध्ये पाणी आणि आरोग्यासाठीची स्वच्छता (water and sanitation department) या विभागात ज्युनियर इंजिनीअर म्हणून कामाला सुरुवात केली. या विषयावर काम करताना असं लक्षात आलं की आपण जे करतोय त्याचा थेट फायदा कुणाला तरी होतोय. आणि या मंचावरून आपण लोकांच्या मूलभूत गरजांसाठी काम करू शकतो, याचं खूप अप्रूप वाटलं होतं.

**टाटा उद्योग समूहात प्रवेश**

Tata Consulting Engineers Ltd (टीसीई) चं कार्यालय तेव्हा पुण्यात नव्हतं. ते जेव्हा पुण्यात उघडणार असं कळलं तेव्हा मी अर्ज केला होता. त्या अर्जातील प्रश्नावली भरताना तुम्हाला हे क्षेत्र का निवडावसं वाटलं असा त्यात प्रश्न होता. मला या मार्गातून लोकांची सेवा करायची आणि त्यांना येणारे प्रश्न सोडवायचे आहेत असं पदवी झाल्यानंतर अवघ्या दोन ते तीन वर्षांनंतरच्या मुलीचं हे उत्तर होतं. माझी मुलाखत घेणाऱ्या पॅनेलला हे खूप वेगळं वाटलं आणि त्यांनी मला हे नंतर आवर्जून सांगितलं. हे विचार मला सिव्हिल इंजिनीअरिंग शिकताना मिळालेले नसून प्रबोधिनीच्या संस्कारातून झिरपलेले आहेत हे लक्षात आलं. टीसीईमध्ये मला माझा मार्ग सापडला हे तक्षात आलं. टीसीईमध्ये मला माझ्या क्षमता वापरण्याची आणि अजून वाढवण्याची संधी मिळाली.

प्रत्यक्ष कामाचं स्वरूप पहायचं झालं तर मी इंजिनीअरिंग कन्सलटन्सी आणि प्रकल्प सल्लागार म्हणूनच काम केलेलं आहे. कन्सलटंट म्हणून काम करताना कामाची क्षेत्रं बदलत गेली. आधी पाणी पुरवठा आणि मलनिस्सारण या स्वरूपाचे प्रकल्प होते. नंतर सिंचन प्रकल्प, मॅन्युफॅक्चरिंग प्लांट इंजिनीअरिंग, आयटी ऑफिसेस, R&D campuses, रुग्णालये, skill parks आणि विद्यापीठे अशा अनेक बांधकामाच्या प्रकल्पात काम केलं. आता मेट्रो, urban smart cities, multi model hubs अशा प्रकारच्या प्रकल्पांचे नवीन क्षेत्र विस्तारत आहे. आमच्याकडे सरकारी आणि खासगी अशा दोन्ही स्वरूपाचे ग्राहक असतात. "Concept to Commissioning' हे आमच्या कामाचे स्वरूप आहे. त्यामुळे अगदी सुरुवातीच्या आराखड्यापासून

किंबहुना pre feasibility report करण्यापासून आम्ही क्लायंटच्या बरोबर असतो. प्रकल्पाचे मास्टर प्लॅनिंग करणे, डिटेल्ड इंजिनीअरिंग करणे, त्यांना लागणारे कंत्राटदार व व्यवस्थापक नेमणे, त्यासाठीच्या खर्चाचे आणि वेळेचे अंदाजपत्रक अशा अनेक स्वरूपात आम्ही सल्लागार म्हणून काम करतो. हे सर्व करताना प्रकल्पाच्या सर्व गरजा विचारात घेऊन काम केले जाते. आय कोडल किंवा international codal provisions, statutory norns, स्थानिक नियम आणि अटी, जमिनीचे आणि पाण्याचे सर्वेक्षण अहवाल आणि त्यांची योग्य पडताळणी करून डिझाईन केली जातात. भूकंप आणि वाऱ्याच्या झोताचा अंदाज घेऊन त्या प्रमाणे डिझाईन किती भक्कम करायचे याची तपासणी केली जाते. ग्रीन इंजिनीअरिंगच्या तरतूदी विचारात घ्याव्या लागतात. अद्ययावत तंत्रज्ञानाचा उपयोग यामध्ये केला जातो. मूल्यवर्धित आणि नाविन्यपूर्ण उपाय याचा विचार केला जातो. आणि ऑपरेशन आणि मेंटेनन्सची किंमत कशी कमी राहील या बाबी पण विचारात घेतल्या जातात. कुठल्याही प्रकल्पाची अंमलबजावणी करताना सुरक्षितता, दर्जा, खर्चाचा अंदाज आणि वेळ या चार गोष्टींचे पालन करणे ही खूप महत्त्वाची जबाबदारी असते. सुरुवातीच्या काळात मी प्रकल्प डिझाईन इंजिनीअरिंगमध्ये काम केले नंतर प्रकल्प सल्लागार म्हणून होते. पण आता मात्र मी संपूर्ण व्यवस्थापकीय क्षेत्रातच काम करते आहे.

The benifit of a facility/ infrastructre is reaped by millions of people, built by thousands of people, and conceptualised by very few people. I am fortunate to be one of those real visionary people who plan it. The impact of even a minute aspect of our planning, designing and execution remains there for very long time say for 30 to 40 years for any infrastructure project. That's where the importance of Role of Consultant comes into the picture.

आमच्या कंपनीचं काम हे भारतातील सगळ्या राज्यांमध्ये होतं. काही आंतरराष्ट्रीय प्रकल्पांसाठी मी युगांडा, आयव्हरी कोस्ट इथेही भेट देऊन आले. वेगवेगळ्या देशातल्या लोकांबरोबर काम करतानाही वेगळ्या गोष्टी लक्षात येतात. भारतातल्या राज्यांमध्ये पण त्यांची स्थानिक अशी वैशिष्ट्ये लक्षात येतात. कर्नाटक, गुजराथ, मध्य प्रदेश या राज्यांतील सरकारी प्रकल्प खूप चांगल्या पद्धतीने पुढे नेले जातायत. इंदूर आणि भोपाळ सारखी शहरे 'भारत स्वच्छ मिशन' च्या क्रमवारीत कायम अग्रणी राहिलेले आहेत. ओडिशा सारख्या राज्याने वादळ आणि त्याचं व्यवस्थापन खूप नाविन्यपूर्ण आणि चांगल्या पद्धतीने केलेलं आहे. उत्तर प्रदेशमध्ये खूप वेगाने विकास होतो आहे. बिहार किंवा पश्चिम बंगालसारख्या राज्यांमध्ये मात्र परिस्थिती थोडी वेगळी दिसते. दक्षिणेतली राज्ये ही काम करण्यासाठी तुलनेने सुरक्षित आहेत, तशी परिस्थिती ही उत्तरेतल्या राज्यांची नाही. ईशान्य भागातील बदल खूप मोठ्या वेगात चालू आहे. कॉम्प्युटिंगची साधने आणि स्थानिक वैशिष्ट्ये जपत आधुनिक सोयी-सुविधांना अंगिकारण्याची / बदलण्याची क्षमता या दोन्ही गोष्टी वाढलेल्या आहेत. मुख्यतः सरकारी कामामध्ये चांगला बदल विशेष रूपाने जाणवून येत आहे. त्या कामांनाही वेळ पाळणे, शिस्त पाळणे या गोष्टी लागू होत आहेत. आणि ही कामे 'सरकारी स्वरूपाची कामे' या चौकटीतून बाहेर येत आहेत. बाहेरच्या देशांबरोबर काम केल्यावर आपल्या भारतात उपलब्ध असलेल्या बऱ्याच गोष्टींची किंमत कळते. आफ्रिकेतल्या लोकांपेक्षा आपल्याकडे तंत्रज्ञान आणि सुबत्ता जास्त आहे. आणि युरोपीय देशांपेक्षा आपल्याकडे सुविधा कमी किंमतीत उपलब्ध आहेत.



**Site visit at Uganda with Experts from Govt. of Uganda, Africa**



**युगांडामध्ये सिंचन व कृषी मंत्रालय प्रतिनिधींबरोबर**

### स्त्री अधिकारी म्हणून आव्हाने

टीसीईमध्ये अनेक वेगवेगळे मोठ्या स्तरावरचे प्रकल्प करायला मिळाले. सुरुवातीच्या काळात अनेक प्रकल्पाच्या जागेवर स्त्रियांसाठी स्वच्छतागृह सुद्धा उपलब्ध नसायची. सिव्हिल इंजिनीअरिंग आणि अशा प्रकारच्या प्रकल्पांवर काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण तर खूपच नगण्य होते हे अनेकदा जाणवायचे.



**भोपाळ येथे आढावा घेताना मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री श्री. शिवराजजी चौहान**

ग्राहकांच्या अधिकारी वर्गाला एखाद्या स्त्री अधिकाऱ्या बरोबर काम करण्याची फारशी सवय नव्हती. त्यांच्या मानसिकतेवरती पण मला काम करावं लागलं होतं. संपूर्ण टीममध्ये एकही स्त्री कर्मचारी अथवा अधिकारी नसताना, बरोबरीच्या पातळीवर चर्चा करणे, सगळ्यांना सूचना देणे, त्यांच्याकडून कामं करवून घेणे, एक अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळणे या तशा अवघड गोष्टी होत्या. आणि यासाठी स्वतः आत्मविश्वासाने समोर उभं राहणं, स्वतःवर काम करणं हे मला पहिले करावं लागलं. काही वेळेस पुरुषी अहंकाराला सामोरं जावं लागलं आणि काही वेळेस चुकीच्या मार्गाच्या वागणुकीलाही सामोरं जावं लागलं, पण तुम्ही तुमच्या कामाशी एकनिष्ठ आणि प्रामाणिक असाल तर पुढे जाण्यापासून तुम्हाला कोणीही रोखू शकत नाही या एका सिद्धांतावर मी ठाम राहिले.




**टीसीईच्या वार्षिक संमेलनामध्ये सूत्रसंचालन करताना**

टीसीईमध्ये हा भेदभाव झाला नाही. 'Equal opportunity employer' या उद्दिष्टाला अनुसरून मला माझ्या क्षमतेनुसार संधी मिळत गेल्या. एक आठवण म्हणजे, आमच्याकडे एकदा एक स्वीडिश कंपनीचा प्रकल्प होता. त्यांना अर्थातच या कामांमध्ये जास्त प्रगत देश असं मानलं जातं. त्या प्रकल्पासाठी मला प्रकल्प अधिकारी म्हणून नेमलं होतं. पहिली मीटिंग उत्तम झाली. त्यानंतर मात्र त्यांनी माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे आम्हाला कुणी दुसरा व्यवस्थापक मिळावा अशी मागणी केली होती. त्यांच्या प्रकल्पाला एक स्त्री व्यवस्थापक आहे आणि तिच्या खांद्यावर या प्रकल्पाची जबाबदारी टाकणं ही कल्पनाच त्यांना पटत नव्हती. पण माझ्या अधिकाऱ्यांनी मात्र त्यांना सांगितलं की तुमचं काम व्यवस्थित होईल यावर विश्वास ठेवा. त्यावेळी आपल्या राष्ट्रपती पदावर मा. प्रतिभाताई पाटील नुकत्याच नियुक्त झाल्या होत्या. ज्या देशाची सर्वोच्च नागरिक या महिला आहेत त्या देशात तुमच्या प्रकल्पाला महिला अधिकारी आहे म्हणून कसलाही त्रास होणार नाही असा विश्वास देण्यात आला. अर्थात हा विश्वास सिद्ध करण्याची जबाबदारी माझी, त्यामुळे मी मात्र कसोशीने माझ्या कामात १००% टक्के द्यायचे. छोट्या-छोट्या चुका सुद्धा टाळणे कटाक्षाने पाळले. कारण, बघा म्हणून आम्ही सांगत होतो, आम्हाला ही मॅनेजर नको असं वाक्य बोललं जायची धास्ती असायची. माझ्याजागी जर तिथे एखादा पुरुष प्रकल्प अधिकारी असता तर he was better placed to fail. आणि यासाठी सुरुवातीला दुप्पट कष्ट करावे लागायचे. एका शहराच्या महानगरपालिकेच्या प्रकल्पाच्या वेळी, स्थायी समितीसमोर आमचं सादरीकरण होतं तेव्हा मला त्यांच्याकडून असं सांगण्यात आलं, की तुमचं काम उत्तम झालेलं आहे पण मॅडम येताना कुणीतरी वरिष्ठ पुरुष अधिकाऱ्याला घेऊन या. आपल्याकडच्या लोकांच्या मानसिकतेमध्ये तुम्ही हा विषय सभेमध्ये मांडणे हे अजून बसणार नाही. ही वस्तुस्थिती आहे. अर्थातच अशा प्रकारच्या बायस विचारसरणीचा ताण मला माझ्या बाकीच्या सहचाऱ्यांपेक्षा थोडा जास्त यायचा. मी असं मानते की हा माझा स्वतःचा निर्णय होता. मला त्या परिस्थितीत सपोर्ट टीममध्ये बसून कामं करायला कुणीही नाही म्हणू शकलं नसतं. तो काळच तसा होता. पण माझी विचारसरणी अशी होती, की एकदा तुमच्या स्वतःच्या मनाला मागे राहून काम करण्याची सवय लागली की तुम्हाला कोणीही पुढे ढकलू शकत नाही. हे कायम पुढाकार घेऊन काम करण्याचे धैर्य तुम्हाला स्वतःलाच दाखवावं लागतं. तुम्ही हार मानायला लागलात की घरचे काय, बाहेरचे काय तुम्हाला हेच म्हणणार,की तुला जे योग्य वाटते ते कर. Owning a leadership role was a matter of choice. माझा कायम असा विचार होता, जर तुम्ही समानतेची अपेक्षा करत असाल तर तेवढं समानतेने कामपण करायला हवं. मला हेच काम करायचं आहे किंवा हाच रोल करायचा आहे असा अहंकार नव्हता पण हा माझा स्वाभिमान होता आणि माझ्या स्वतःच्या क्षमतांवर विश्वास होता.



**टीसीई मधील अन्य उपक्रम**


**मोठ्या प्रकल्पांचे आर्थिक व सामाजिक परिणाम**

जेव्हा कुठलेही मोठे पायाभूत सुविधा देणारे प्रकल्प असतात त्या वेळेला काही सामान्य जनतेशी भिडणारे प्रश्न समोर दिसतात. असाच त्यातला एक विषय म्हणजे धरण. कुठल्याही धरण प्रकल्पाचा समाजावर, अर्थव्यवस्थेवर आणि लोकांच्या जीवनावर एकूण दिसणारा परिणाम हा खूप मोठ्या स्वरूपाचा असतो. मुळात आधी धरण का बांधलं जातं हा मुद्दा लक्षात घ्यायला हवा. भारतासारख्या समशितोष्ण प्रदेशात साधारण चार महिने मौसमी पाऊस पडतो आणि तेच पाणी साठवून ठेवून वर्षभर वापरावं लागतं. धरण प्रकल्पाचा मुख्य उद्देश हा पावसाळ्यात पूर व्यवस्थापन आणि उर्वरित वर्षाकरता पाण्याची साठवण असा आहे. धरण प्रकल्पामुळे अगदी दुर्गम, दुष्काळी आणि कठीण जागांपर्यंत पाणी पोचवलं जातं. पाणी आल्यावर त्या

भागाचा विकास आणि संवर्धन होते.  मला वाटतं धरण प्रकल्पाचे जेवढे तोटे चर्चिले जातात तेवढे फायदे कदाचित चर्चिले जात नाहीत. आपल्याला जर विकास हवा असेल, अर्थव्यवस्थेला चालना हवी असेल, तर धरण प्रकल्प, वाहतुकीचे अनेक प्रकल्प उदाहरणार्थ महामार्ग, मेट्रो, जास्त वेगाच्या रेल्वे या रचना स्वीकारायलाच हव्यात. केवळ आंदोलन करून स्थगिती देणं हे त्यावरचं उत्तर नव्हे. छोटी धरणं बांधा किंवा छोटाच रस्ता हाही उपाय संपूर्णपणे लागू होऊ शकत नाही. जितकं छोटं धरण तितकं लहान त्याचं प्रभावक्षेत्र. शंभर पणत्या जरी लावल्या तरी त्याला एका मोठ्या दिव्याची सर येऊ शकत नाही. जेव्हा नर्मदेसारख्या मोठ्या धरणांचा विचार केला जातो तेव्हा सौराष्ट्र, जामनगर अशा अनेक भागांमध्ये ते धरण बांधल्याशिवाय पाणी येण्याचा दुसरा कुठलाही पर्याय उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेतली पाहिजे.

आता प्रकल्पामुळे होणारे नुकसान आणि फायदा याचा तौलनिक विचार कसा ठरवायचा आणि कोणी ठरवायचा हा ही एक मोठा विषय आहे. इथे कुठेतरी अधिकाऱ्यांची क्षमता पणाला लागते. काम स्थगित करणे किंवा प्रकल्प रद्द करणे यापेक्षा प्रकल्पामुळे जो बाधित समाजवर्ग आहे त्यांची नुकसान भरपाई योग्य पद्धतीने करता येईल याचा विचार झाला पाहिजे. त्यांच्या आयुष्याची सोय कशी योग्य प्रकारे करता येईल यावर अजून काम होणे आवश्यक वाटते. नुकसानग्रस्त समाजाला लाभार्थी म्हणून कसे बदलता येईल यावर काम केले पाहिजे. नुकसानग्रस्तांना कायदेशीर पद्धतीने अधिकार मिळणे हे कदाचित या प्रश्नाचे खरे उत्तर आहे. अर्थात हा विषय पूर्णपणे तांत्रिक नसून सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विषयाशी जास्त जोडलेला असतो.

या सगळ्या प्रवासात एक अवघड आणि आव्हानात्मक प्रसंग आठवतो आहे. टाटा मोटर्सच्या सिंगूर येथील नॅनो मॅन्युफॅक्चरिंग प्रकल्पाचे काम सुरू होते. या प्रकल्पाची सामाजिक आणि राजकीय संवेदनशीलता याची सगळ्यांना कल्पना आहेच. परंतु तांत्रिक दृष्टीनेसुद्धा हा प्रकल्प म्हणजे एक आव्हानात्मक प्रकल्प होता. २००७ सालच्या ऑगस्ट मध्येच त्या चारशे एकर जागेत अचानक १.५ ते २ मी.मी. पाणी भरलं. त्याची बातमी टीव्हीवर दिसायला लागली. या अचानक उद्भवलेल्या परिस्थितीवर तोडगा काढण्याकरता टीसीईची नेमणूक करण्यात आली आणि त्या प्रकल्पाची व्यवस्थापक म्हणून मला नेमण्यात आलं. प्रकल्पाची जागा ही हावरा–दुर्गापूर हायवेला लागून आहे आणि जमिनीच्या दोन्ही बाजूने काना आणि  जूलकिया नदीचे पात्र आहे. त्रिभूज प्रदेश असल्यामुळे दलदल आणि सपाट जमिनीमुळे पाण्याचा निचरा करणे हे खूपच आव्हानात्मक काम होते. अर्धवट झालेले बांधकाम, प्रकल्प पुढे न्यायची टाटा मोटर्सची उद्दिष्टे आणि इतर संवेदनशीलता यामुळे या प्रश्नाच्या तोडग्यावर अनेक पातळीवर सतत आढावा घेण्यात येत होता. परिस्थिती सर्वच बाबतीत आव्हानात्मक होती. अर्थात कालांतराने अन्य कारणासाठी प्रकल्प दुसऱ्या जागी हलवण्यात आला, परंतु तेव्हा जो ताण आला तो मी आजही विसरू शकत नाही. त्या तांत्रिक आव्हानावर उत्तर शोधून काढणे हा आजपर्यंत सगळ्यात आव्हानात्मक प्रसंग वाटतो.




खोपोली हायड्रो पॉवर स्टेशन हे भारतातील पहिले पाण्यापासून वीजनिर्मिती करणारे पॉवर स्टेशन. जमशेदजी टाटा  यांनी धूर मुक्त वीजनिर्मितीचे १९१६ साली साकारलेलं हे स्वप्न. या पॉवर स्टेशनला चार धरणांमधून  पाणीपुरवठा होतो. कुंडली धरण हे या साखळी मधलं १९२७ साली बांधलेलं शेवटचं धरण. दुर्दैवाने हे धरण बांधल्या नंतर दुसऱ्याच वर्षी फुटलं आणि तेव्हापासून ते कधीच कार्यान्वित नव्हतं. आमच्या टीमने lateral thinking चा उपयोग करून कुंडली खोऱ्यामधले पाणी वीज निर्मिती करता उपलब्ध करण्याची योजना वेगळ्या पद्धतीने अवलंबली आणि



**Promising Innovation Award function**



**कुंडली नदीच्या खोऱ्यामधील पाणी–वीज प्रकल्प**

यशस्वीरित्या कार्यान्वित पण केली. नवीन उपाय हे कमी खर्चात, कमी वेळात होणारे  आणि पर्यावरण पूरक होते. Pump the Power या नावाने आमचे हे नावीन्यपूर्ण उपाय Promising Innovation म्हणून २००८ साली  Tata Group regional platform वर पारितोषिक मिळवणारे ठरले. या पारितोषिकानंतर माझी अशी एक वेगळी ओळख निर्माण झाली आणि कार्य क्षेत्र अधिक प्रमाणात विस्तारले. त्यानंतर मग मी मागे वळून बघितलंच नाही.

माझ्या आई-बाबांना, सासू-सासऱ्यांना, सर्व शिक्षक आणि हितचिंतकांना याच्यापेक्षा मोठी कुठलीच भेट देवू शकले नसते. आपण जे काम करतो आहोत त्याचं सार्थक झाल्यासारखं वाटलं. तेव्हापासून मला आणखी नवी आणि आव्हानात्मक जबाबदारी आणि कामं मिळत गेली.

टाटा ग्रुप मध्ये Leadership Training करता माझी निवड  झाली.  टाटा ग्रुप मधल्या प्रत्येक कंपनीला  व्यवसायासाठी काही कडक नियम आहेत. प्रत्येक कंपनीचे त्या निकषांवर मूल्यांकन केले जाते. अमेरिकेतल्या Malcum Baldeidge अवॉर्ड च्या चौकटीवर आधारित हे नियम ठरवले जातात आणि कायम अद्ययावत केले जातात. कंपनीच्या मूल्यांकना करिता टाटा ग्रुप मधल्याच पण अन्य कंपनीमधले निवडक अधिकारी विशेष प्रशिक्षण घेऊन मूल्यांकन करतात. अतिशय समग्र अशी ही  प्रक्रिया व्यवसायाच्या सर्व मापदंडाची म्हणजे, नेतृत्व, कंपनीच्या कारभाराची धोरणे, ग्राहक, व्यवसायाच्या प्रक्रिया, मानव संसाधने, माहिती व्यवस्थापन, व्यवसाय परिणाम, आणि या सगळ्याचे एकमेकांची असलेले संबंध  अशा सगळ्या आयामांना  विचारात घेऊन कंपनीच्या सगळ्या व्यवस्थापनाला प्रतिसाद  देते. माझं या ट्रेनिंग करता नामांकन करण्यात आलं आणि त्या नंतर मी दर वर्षी एक या पद्धतीने चार टाटा कंपन्यांकरिता बाह्य निर्धारक (external assessor) म्हणून काम केले. आता मी अनुभवी बाह्य निर्धारक (Experienced External assessor ) अशी पात्रता मिळवली आहे. या सगळ्या assessments मधून मला अभियांत्रिकीच्या  पुढे जाऊन व्यवस्थापनाचा खूप सखोल दृष्टीकोन मिळाला. त्याहून ही महत्त्वाचे म्हणजे टाटा way of business चे पैलू आत्मसात करायला उपयोगी ठरले.



**External Assessors Team with Mr. Muthuraman, M.D. Tata Steel**




**उत्तमता आणि नैतिकता हेच मूल्य**

जे करू ते उत्तमच करू आणि कायम स्वत:ला नवीन-नवीन आव्हाने देऊ ही जी विचारसरणी लहानपणीच प्रबोधिनीने बिंबवली तिचेच हे पुढचे पाऊल ठरले. नुसता व्यवसाय चालवणे नाही तर त्यातली उत्तमता म्हणजे काय, ज्या क्षेत्रात कंपनी चे काम असेल त्या क्षेत्रात ती कंपनी नेतृत्व स्थानावर कशी असेल आणि त्याचबरोबर ही वाढ शाश्वत कशी असायला पाहिजे याचे खूप सखोल शिक्षण आणि त्याच बरोबर ती अंगिकारणे म्हणजे टाटा business excellence Assessment. याच बरोबर Tata code of conduct - हे  सुध्दा सर्व टाटा ग्रुप मधल्या कंपन्यांकरिता  अनिवार्य आहे. टाटा ग्रुपची दीडशे वर्षं सांभाळलेली जी मूल्ये आहेत ती code of conduct या स्वरूपात बद्ध केलेली आहेत. व्यवसाय मूल्य योग्य पद्धतीने पाळण्याकरता प्रशिक्षण देणे आणि कुठली ही अडचण आली की तपासणी करणे या करता प्रत्येक टाटा कंपनीमध्ये नैतिकता समुपदेशक यासाठी नामांकन केले जाते. मी ही भूमिका टीसीईमध्ये गेली दहा वर्षं बजावते आहे. नैतिकदृष्ट्या अतिशय जबाबदार असा हा रोल असून कायदेशीर पालनाच्या पेक्षा  वरच्या पातळीवर जाऊन ही जबाबदारी कायमच जाणीवपूर्वक पाळत आले आहे आणि आता या सगळ्या भूमिका माझ्या व्यक्तिमत्त्वाचा भाग झाल्या सारख्या आहेत. प्रबोधिनी मध्ये रोवलेले हे विचारांचे बीज खूप छान पद्धतीने टाटा ग्रुपमध्ये मला माझी या प्रकारची ओळख निर्माण करायला नक्कीच उपयोगी पडलं.



**TBEM Award winning function**



पायाभरणी आढावा घेताना अधिकाऱ्यांसमवेत



गर्भगृहाच्या पवित्र जागेवर



प्रकल्पाचे मुख्य अधिकारी मोदीजींनी लावलेल्या कल्पवृक्षासमवेत

**अयोध्या राममंदीर निर्मितीत खारीचा वाटा**

२०२०च्या नोव्हेंबर मध्ये टाटा कन्सलटन्सी इंजिनीअर्स लि. ला अयोध्या येथील ऐतिहासिक रामजन्मभूमीवर श्री राम मंदिराच्या निर्माण प्रकल्पाच्या आरेखनाचे पुनरावलोकन आणि प्रकल्प व्यवस्थापन सेवा (design review and project management services) चे काम देण्यात आले. कंपनीमधल्या काही निवडक अधिकाऱ्यांना त्या प्रकल्पावर काम करण्याची संधी मिळाली आहे. माझ्यावर त्यात मंदीर परिसर विकास इंजिनीअरिंग मॅनेजर या पदाची जबाबदारी आहे. हा प्रकल्प आव्हानात्मक तर आहेच परंतु त्याच बरोबर संपूर्ण भारतातल्या आणि परदेशातल्या लोकांच्या नजरा त्यावर लागलेल्या आहेत. शेकडो वर्षांच्या लढण्यानंतर आणि शेकडो बलिदानांतून निर्माण होणारे हे हिंदू अस्मितेचे प्रतीक पुढील हजार वर्षे टिकेल असे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. बांधकामाचे सर्व निकष या उद्दिष्टानुसार पडताळून पाहण्यात येत आहेत. या प्रकल्पामध्ये श्री रामजन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या वतीने अनेक संत-महंत, आयएएस अधिकारी तर आहेतच आणि त्याच बरोबरीने राजकीय पक्ष, सरकारी यंत्रणा, राष्ट्रपातळीवरच्या अनेक देशप्रेमी आणि या विषयाशी आस्था असलेल्या संस्था प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या निगडित आहेत. भारतातले नामवंत आर्किटेक्टस, इंजिनीअर्स, कॉन्ट्रॅक्टर्स आणि आयआयटी सदस्य या कामात सहभागी करून घेण्यात आले आहेत. या भव्य राममंदीराच्या निर्माणाबरोबरच राष्ट्रमंदीर निर्माण करण्यात खारीचा वाटा उचलण्याची संधी मिळाली याचे समाधान, अभिमान आणि त्याच बरोबर जबाबदारीची जाणीव कायम ठेवून अविरतपणे काम चालू आहे. या प्रकल्पावर काम करताना एक जाणीव खूप ठळकपणे होते, ती म्हणजे या कार्याशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात अपरंपार श्रद्धा आहे आणि त्यामुळे प्रत्येकजण स्वतःकडून जास्तीत-जास्त काय देता येईल या दृष्टीने काम करतो आहे. हे उत्खनन करणाऱ्या कामगारापासून, सीआरपीएफ जवान जो जागेची राखण करतो आहे तिथपासून, सरकारी अधिकारी आणि सर्वोच्च अधिकारी या सर्वांच्या भावनेतून ही श्रद्धा दिसते आहे. व्यक्तिगतरित्या माझ्या आयुष्यात या निर्माण कार्यात सहभागी होता येणार आहे हे खरोखरच परमोच्च शिखर आहे. अनेक समाजाभिमुख प्रकल्प केल्यानंतर देशसेवेची आणि पारमार्थिक सेवेची ही सर्वोत्तम संधी अशीच भावना मनात ठेवून मी सतत कार्यरत आहे.


**आयुष्यातील समतोल**

इंजिनीअरिंग कन्सलटन्सी या क्षेत्रामध्ये अनुभव असणं हे खूप महत्त्वाचं आहे, ही गोष्ट कधीही तयार मिळत नाही. आता गेल्या ३० वर्षांच्या वेगवेगळ्या जबाबदाऱ्यांमध्ये तावून-सुलाखून निघाल्यानंतर माझ्यावर असलेल्या आत्ताच्या जबाबदारीमध्ये स्त्री-पुरुष असा काही भेदभाव उरलेला नाही. सुरुवातीपासून दाखवलेल्या धैर्यामुळे आता मी स्वतःला सिद्ध करून समान पातळीवर काम करत आहे. ते धैर्य सुरुवातीलाच कुठेतरी प्रबोधिनीने दिलं, विचारांमध्ये बिंबवलं असं वाटतं. हा कामातला भाग झाला. स्त्री म्हणून घर-कुटुंब-समाज हा समतोल आयुष्यातला एक वेगळा आणि महत्त्वाचा भाग आहे.



आई-वडिलांबरोबर

work life balance याबद्दल जेव्हा बोललं जातं तेव्हा मला एकच सांगावसं वाटतं, की प्रत्येक ठिकाणी आपली ओळख/ नातं काय आहे आणि आपण काय करणं गरजेचं आहे हे ओळखायला हवं. मी फक्त पैसे कमवते म्हणजे सगळं झालं असं नसतं. माझ्या मुलाला आई म्हणून माझी काय गरज वाटते / माझ्याकडून काय अपेक्षा असतात ? माझ्या नवऱ्याला बायको म्हणून काय गरज वाटते हे एकदा समजून घेतलं की आपण स्वतः काय करायचं आणि कुठल्या कामात बाहेरची मदत घ्यायची हे आपोआप लक्षात येतं. माझ्या नवऱ्याचा या संपूर्ण वाटचालीत खूपच मोलाचा वाटा आहे. नुसता सपोर्ट म्हणून नाही



पती व मुलगा यांच्या बरोबर


तर अनेक अवघड प्रसंगांमध्ये त्याने अधिमित्राची (mentor) भूमिका केली आहे. अवघड गोष्टी खूप सोप्या करून सकारात्मकरित्या पुढे घेऊन जायच्या ही त्याची विचारसरणी आहे आणि मला त्याचा वेळोवेळी खूप फायदा झाला आहे. माझा मुलगा आता अमेरिकेत असतो आणि तो स्वयंपूर्ण आहे. जेव्हा मी हे बघते तेव्हा मला असं वाटतं की मी नोकरी न करता जे संगोपन केलं असतं कदाचित त्यापेक्षा त्याला जास्त व्यापक संस्कार मला नोकरी करत असताना देता आलेले आहेत. पालक म्हणून आमच्या त्याच्या बरोबरच्या संवादामधून, आमच्या जगण्यातूनपण तो बऱ्याच गोष्टी शिकत गेला आणि आता अतिशय सक्षमपणे स्वतःला सिद्ध केलं आहे. आता जेव्हा सासू या भूमिकेत मी जाईन तेव्हा मला आत्ताच्या पिढीचे ताण-तणाव किंवा संघर्ष जास्त चांगले समजून घेता येतील असं वाटतं. काम करताना, नोकरीत आपण अनेक ठिकाणी आपल्या मनाविरुद्ध वागत असतो. आपल्या वरिष्ठ लोकांसाठी, कामासाठी अनेक गोष्टी आपण ॲडजस्ट करतो पण सासूबरोबर, घरातल्या लोकांबरोबर ॲडजस्ट करताना मात्र आपल्याला प्रश्न पडतो. आपण घरी समायोजन करायला शिकणं सगळ्यात महत्त्वाचं आहे. मी माझ्याच पद्धतीने सगळं करेन हा हेका जर आपण लावून धरला तर त्यातून येणारा ताण हा खूप मोठा आहे. या उलट जर आपण आपल्या घरी थोडं आणखी मुक्त विचाराने वावरलो तर त्यांचा आपल्याला मिळणारा पाठिंबा हा आपल्याच आणि सगळ्यांच्या फायद्याचा असतो हे आपण बघायला हवं. माझे सासू-सासरे हे माझे दुसरे आई-बाबाच आहेत. आणि त्यांची मोजण्याच्या पलिकडे मोलाची मदत या सगळ्या वाटचालीत झाली आहे. अजूनही माझ्या काम आणि आयुष्यात समतोल आहे असं मी म्हणणार नाही. वेगळं काहीतरी विधायक काम करते आहे आणि त्यातून मला नवीन ऊर्जा मिळते असा विश्वास आहे.



**सासू-सासरे यांच्या समवेत**

**अनेक अधिमित्र**

गुरूतुल्य व्यक्ती असं म्हणताना डोळ्यासमोर पहिलं नाव हे प्रबोधिनीचंच येतं. आप्पा आणि इतर शिक्षक हे निश्चितच गुरूस्थानी आहेत. कॉलेजमध्ये आम्हाला मराठे सर शिकवायला होते, एखाद्या विषयाप्रति ज्ञान किती सखोल असावं आणि त्या विषयी किती आत्मीयता असावी हे त्यांच्याकडून शिकायला मिळतं. ऑफिसमध्ये श्री. दांडेकर म्हणून माझे वरिष्ठ होते, त्यांच्याकडून एखाद्या प्रकल्पाची संकल्पना आणि तो साऱ्या संबंधितांना उत्कृष्टरीत्या कसा समजून सांगायचा हे मी शिकले. ऑफिसमधले अजून एक वरिष्ठ श्री. दीपक गोखले यांच्याकडून एखाद्या गोष्टीच्या मूळापर्यंत जाऊन कसा अभ्यास करायचा हे शिकले. Mr A P Mull, सीईओ यांच्याकडून व्यवसायातले dos and donts शिकायला मिळाले. या सगळ्या व्यक्ती मला मार्गदर्शक म्हणून कायमचे गुरूस्थानी आहेत. मी असं म्हणेन की या सगळ्यांच्या बरोबरच टाटा इन्स्टीट्यूशन जे स्वतःच एक उच्च गुणवत्तेचे, मूल्याधिष्ठित व्यवसायाचे (value based), विश्वासाचे (Trust) आणि ethics based conduct चे रोल मॉडेल आहे, ती संपूर्ण विचारप्रणाली पण मला मार्गदर्शक म्हणून मिळाली.




या संस्थेमध्ये काम करताना मला जबाबदार आणि सर्वसमावेशक नेतृत्व म्हणजे काय असतं हे कळलं. या विचारसरणीने मला एक व्यक्ती म्हणून पण घडवलं. आणि नुसतं तत्त्व म्हणून नाही तर खऱ्या अर्थाने जे-जे उत्तम-उदात्त-उन्नत असंच काम करत उत्तमता गाठायला शिकवलं. तुमच्या सर्व कामामध्ये समाजाचा पण महत्त्वाचा सहभाग आहे, त्याचा वाटा आहे असा विचारांचा पाया घडवला. मूल्य जोपासत काम करणं हे टाटाने शिकवलं आणि ही माझ्या व्यक्तिमत्त्व विकासाची सगळ्यात महत्त्वाची पायरी झाली. तुमचा व्यवसाय हा फक्त आर्थिक उलाढाल आणि ग्राहकहित बघून नाही तर तो मूल्य आणि नितीमत्तेतही मोठा असला पाहिजे हे टाटाने शिकवलं. आम्ही टाटाच्या अनेक कंपन्यांमध्ये मूल्यमापनासाठी जातो तेव्हा हा एक महत्त्वाचा निकष असतो. आणखी एक अधिमित्र म्हणजे माझे वडील. माझ्या वडिलांनी कधीही मुलगा आणि मुलगी असा भेद केला नाही. त्यामुळे हा भेद मला माहीतच नव्हता. आज जेव्हा मी मागे वळून पाहते तेव्हा, त्यांनी आपल्याला असं कसं सहज करू दिलं असा प्रश्न मलाच पडतो. मला व्याख्याता म्हणून काम करण्यापेक्षा field वर काम केलं पाहिजे याची प्रेरणा माझ्या वडिलांनी दिली. केवळ शिकण्यापुरते म्हणून कधीही शिकायचं नाही आणि कायम चांगलं काम करण्याचं उद्दिष्ट ठेवायचं. हे माझ्या बाबांकडून

कायमच सांगितलं गेलं. त्यामुळे या संपूर्ण वाटचालीवर पुढची आव्हाने घ्यायची की सोडायची असा प्रश्न असायचा तेव्हा ती स्वीकारायची हे ठरलेलेच असायचे.

आजपर्यंत माझं आयुष्य या सगळ्या व्यक्तिमत्त्वांमुळे, संस्थामुळे घडलं. आता आयुष्याच्या पुढच्या टप्प्यावर जाताना मी किती जणांना घडवू शकते. किती लोक मला अधिमित्र म्हणून आठवू शकतील याचा मी विचार करते. इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर आता मी अधिमित्र या भूमिकेतून काम करणे ही काळाची, समाजाची आणि माझ्या कार्यक्षेत्राची गरज आहे असं मला वाटतं. ही माझी सामाजिक बांधिलकी पण आहे असं प्रकर्षाने वाटतं. नव्या येणाऱ्या पिढीला आम्हाला जे मिळालं त्याच्यापुढे जाऊन माझ्याकडून अजून काय शिदोरी म्हणून देता येईल याचा विचार मी सध्या बरेचदा करते आहे. खूप छोट्या-छोट्या सल्ल्यांनी, मार्गदर्शनाने सुध्दा एखाद्याच्या आयुष्यात फरक पडत असतो असा माझा अनुभव आहे. अशाच एका युवतीशी बोलत असताना ती मला म्हणाली की आम्हाला कोणी अधिमित्रच नाही. त्यावेळी तिच्या मनात काम सोडायचं की चालू ठेवायचे, लग्न, कुटुंब, मूल हा सगळा विषय घोळत होता. तेव्हा मी तिला म्हणलं की भारतातल्या एकूण शिक्षित लोकांची संख्या बघता, त्यातून असं तांत्रिक शिक्षण घेतलेल्या लोकांकडे बघता, तुला टाटा सारख्या कंपनीमध्ये नोकरी मिळालेली आहे हे लक्षात घेता, तू समाजातल्या अत्यंत मोजक्या लोकांपैकी आहेस हे प्रथम लक्षात घे. मग या संधीचं सोनं करून तू एखादा आदर्श बाकीच्यांच्या डोळ्यासमोर उभा करू शकतेस, तू असं ऐन युद्धात शस्त्र सोडून देऊ नकोस. आपापल्या कार्यक्षेत्रात मी उत्तम कामगिरीचे ध्येय ठेवणे हे उदिष्ट आत्ता ठेव, म्हणजे तूच एक अधिमित्र बनून पुढच्या पिढीला मार्गदर्शन करशील. हे ऐकल्यावर तिने नंतर मला मोठं पत्र लिहिलं होतं, आणि आज ती अतिशय चांगल्या पद्धतीने काम करते आहे. असे अनेक छोटे-छोटे अनुभव आहेत. कुठेतरी आपण एखाद्या व्यक्तीचा निर्णय चांगल्या पद्धतीने influence करू शकलो याचा आनंद आहे.

अनुभवाबरोबर आणखी एक विचारात आलेली समृद्धता, I give thrust on the thinking about client's client in addition to clients expectations. सगळ्यात शेवटचा वापरकरता कोण असणार आहे याचा विचार करून निर्णय घेणे ही अनुभवातून आलेली परिपक्वता आहे असं मला वाटतं. जेव्हा आम्ही पाणी पुरवठा सारख्या प्रकल्पावर काम करत होतो तेव्हा त्या-त्या गावातील लोक आम्हाला अक्षरशः देव मानायची. ते ज्या परिस्थितीत राहतात ते पाहून खूप वाईट वाटायचे. आणि जेव्हा मी काम करायचे तेव्हा माझ्या डोळ्यासमोर नुसता त्या कामाचा आराखडा नाही तर ती माणसं यायची. जेव्हा तुम्ही असा विचार करण्याची सवय करता तेव्हा होणारं काम हे नेहमी मनापासूनच होतं.

हे सगळं नेतृत्व आणि समाजाचा विचार करायचे बीज प्रबोधिनीनेच रोवले. आपल्याला सगळ्यांना बरोबर घेऊन, सगळ्यांचा विचार घेऊन जायचं आहे हा विचार मनात असल्यामुळे माझी नेतृत्वाची पद्धत कंपनीमध्ये उठून दिसली. प्रबोधिनीतली कुठली गोष्ट बदलायला हवी हे सांगण्याएवढी मी कोणी मोठी नाही. अजूनही मी प्रबोधिनीला माझ्या गुरूस्थानीच मानते. पण बाहेरचं जग बघितल्यावर एक अशी गोष्ट वाटते, की we are shy in projecting ourselves. आपण काय काम करतो हे आणखी समाजापुढे यायला हवं, जाहिरात हा खरं म्हणजे बरोबर शब्द ठरणार नाही, पण समाजात आज काय चांगल्या गोष्टी होतात हेही समोर यायला हवं. हे ही आपलं काम आहे असं मला वाटतं. आणखी एक म्हणजे प्रबोधिनीच्या सगळ्या परगावी, परदेशी स्थायिक झालेल्या माजी विद्यार्थ्यांना बांधून घेऊ शकू आणि त्यांना त्यांच्या सोईप्रमाणे विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेता यावा असा एखादा मंच असावा असं वाटतं. Jnana Prabodhini Foundation च्या माध्यमातून अशा प्रकारच्या कार्याला नक्कीच चांगली सुरुवात झाली आहे.



**मी आणि माझा भाच्चा**
**प्रणव कुलकर्णी**
**अध्यक्ष, ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन**

जेव्हा माझ्या नावामागे प्रबोधिनीची विद्यार्थिनी, सीओईपीची विद्यार्थिनी किंवा टाटाची कर्मचारी असं नाव जोडते तेव्हा त्याच्याबरोबर येणारी जबाबदारी ही खूप मोठी असते. समाज नकळतपणे अपेक्षा ठेवत असतो. त्या अपेक्षांच्या कसोटीवर मला चोख उतरलं पाहिजे, आपल्या मागच्या नावाच्या लौकिकाला आपण जागलं पाहिजे. आणि हा आपल्या व्यक्तिमत्त्वाचाच एक भाग आहे हे कायम लक्षात ठेवले पाहिजे असं माझं मत आहे. आजकालची पिढी हुशार आहे. चांगली शिकलेली आहे आणि त्यांना काय करायचे आहे हे पक्क माहिती आहे, परंतु संयम आणि कधी-कधी ॲडजेस्टमेंट करायला थोडी कमी पडते अस वाटतं. म्हणजे एक छोटस काम उत्तम केलं की लगेच प्रकल्प प्रमुख व्हायला पाहिजे, तर लगेच असं घडणार नाही हे कुठेतरी लक्षात घ्यायला पाहिजे.

योग्य वेळ आणि कष्ट घेऊन केलेली प्रगती आणि व्यक्तिमत्त्व विकास हा जास्त शाश्वत असणार आहे. There is no shortcut to hardship हे नक्की. तुम्ही जे काम कराल ते झोकून देऊन करा, मगच तुम्हाला त्यात मजा येईल. मगच तुमचं काम उत्तम होईल असं मला वाटतं.

**आज जेव्हा मी जवळपास तीस वर्षांनंतर माझ्या कार्यक्षेत्राकडे बघते. तेव्हा तांत्रिक आणि व्यवस्थापकीय शब्दांच्या पलीकडे जाऊन असं वाटतं की इंजिनिअरिंग सल्लागार हा एक नवनिर्मितीचा अखंड प्रवास आहे. त्यात अनेक समाज रचनेचे आणि मानवी इच्छा–आकांक्षांचे पैलू आहेत. नवनिर्मितीची उत्सुकता आहे, हाती घेतलेले कार्य यशस्वीपणे पूर्ण करण्याचा ध्यास आहे, निर्मितीच्या कळा पण आहेत. त्याच बरोबर आपल्या आसपास पसरलेल्या या अफाट अशा कॅनव्हास वर आपण काहीतरी रेखाटू शकलो याचे समाधान पण नक्कीच आहे. निसर्गाच्या हातात हात घालून आणि गरज पडेल तिथे त्याच्यावर मात करून योजना आखण्याचे धैर्य आहे. नविन्यतेची ओढ आहे आणि तितकेच आपल्या पायाशी असलेल्या भूमिशी नातं बांधून ठेवण्याची प्रक्रिया पण आहे. कधी–कधी वाटते की निर्मितीतला आनंद मोठा का प्रकल्प सुपूर्द करण्यातला आनंद मोठा ? का या दोघांमधल्या प्रवासाचा आनंद मोठा ?**

**श्रमता आपण हिमगिरिचे ते वितळतील हिमहिरे**
**मरुभूमीवर उभी राहतील विभवे सुखमंदिरे..**

**असे हे अविरत चालू असलेले आनंदी गाणे ...**

## माझी भटकंती











## RAPID FIRE

१. आवडता चित्रपट- स्वदेस, आँधी

२. आवडतं पुस्तक- राजा शिवछत्रपती, श्रीमद्‌भगवद्‌गीता, अच्युत गोडबोले यांचे 'अर्थात' आणि सुधा मूर्ती यांचे 'गोष्टी माणसांच्या'

३. छंद- लेखन- माझे अनुभव, विचार, लेख लिहून ठेवायला आवडतात. भटकंती अगदी अनवट जागेपासून परदेशापर्यंत

४. प्रबोधिनीतला लक्षात राहिलेला शिक्षक - आ. नलूताई उजळंबकर - गुजराथी

५. प्रबोधिनीचा लक्षात राहिलेला उपक्रम - वारी, उपासना, दैनंदिनी लेखन

पहिली प्रतिक्रिया

- Civil engineer - Making of the nation
- TATA group - My Pride
- ज्ञान प्रबोधिनी- मातृमंदिर

Regards,

**Ashwini V Kavishwar**
Senior General Manager- Civil
Buidings(IBU)
Tel +91 20 6621 6161 Dir + 91 20 6621 6016 Fax +91 020 6621 6000
6th Floor Central Wing Sai Trinity S No 146 / 1 /28 Pashan Pune 411 021

TATA CONSULTING ENGINEERS LIMITED
*engineering a better tomorrow*
www.tce.co.in

**मुलाखत - अपूर्वा इनामदार** **शब्दांकन - चिन्मयी खरे**

**संपादन - मानसी बोडस, पल्लवी गोखले - नगरकर**

**आरेखन व मांडणी - निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org